पशुसंगोपन

# शेळीपालन फायदेशीर असे होईल!



**डॉ. एम.पी. नांदे**
(मो.नं. ९४२३४०७९८५)
**डॉ. यू.एम. तुमलाम**
**डॉ. ए.के. बाराते**
सहायक प्राध्यापक
क्रांतिसिंह नाना पाटील
पशुवैद्यकीय महाविद्यालय,
शिरवळ, जि. सातारा





शेळीपालनाच्या व्यवसायाकडे शेतीला पूरक व्यवयाय या दृष्टीने पहावयास हवे; तसेच शेळीची नफा देण्याची क्षमता ठरलेली आहे, हेही लक्षात घ्यायला हवे. अपवादात्मक एखादा बोकड मोठ्या किंमतीमध्ये विकला गेला म्हणजे त्याच नियमानुसार सर्व बोकड त्याच किंमतीमध्ये विकले जातील असे नाही. तर आर्थिकदृष्टया फायदेशीर शेळीपालनासाठी खूप बारकावे पाहावे लागतात. यादृष्टीने शेळ्यांची निवड, गोठ्यातील व्यवस्थापन, प्रथमोपचार, लसीकरण आणि  शेळ्यांची विक्री व्यवस्था काटेकोर पाळणे आवश्यक आहे.

आज शेळी अथवा बोकडाचे दर नियंत्रणात नाहीत, तसेच त्यांच्या मटणाचे दर दिवसेंदिवस वाढतच जात आहेत. बाजारात शेळीच्या मटणाला, वाढती मागणी असल्यामुळे या व्यवसायाकडे प्रचंड नफा देणारा व्यवसाय या दृष्टीने पाहिले जात आहे. यामुळे शेळीपालनाकडे नवउद्योजकांचे आकर्षण वाढले आहे. शेळीपालन हा पारंपरिक व्यवसाय आहे, त्यामुळे हा व्यवसाय कोणीही सहज करू शकतो, अशी भावना समाजात आहे.

वस्तुस्थिती मात्र तशी नाही. शेळीपालनाच्या व्यवसायाकडे शेतीला पूरक व्यवयाय या दृष्टीने पहावयास हवे; तसेच शेळीची नफा देण्याची क्षमता ठरलेली आहे, हेही लक्षात घ्यायला हवे. अपवादात्मक एखादा बोकड मोठ्या किंमतीमध्ये विकला गेला म्हणजे त्याच नियमानुसार सर्व बोकड त्याच किंमतीमध्ये विकले जातील असे नाही. तर आर्थिकदृष्ट्या फायदेशीर शेळीपालनासाठी खूप बारकावे पाहावे लागतात. यादृष्टीने शेळ्यांची निवड, गोठ्यातील व्यवस्थापन, प्रथमोपचार, लसीकरण आणि शेळ्यांची विक्री व्यवस्था काटेकोर पाळणे आवश्यक आहे.

**शेळ्यांची निवड** : फायदेशीर शेळीपालन व्यवसायाचा यशाचा पाया म्हणजे शेळीची पैदास आणि पैदाशीमध्ये मोलाचा वाटा असतो तो कळपातील पैदाशीच्या नराचा. म्हणूनच ५० माद्यांच्या निवडीपेक्षा एका पैदाशीच्या नराची निवड अत्यंत महत्त्वाची आहे.

**नराची निवड** : नर हा उंच, लांब, भरदार छातीचा, तब्येतीने सशक्त आणि जातिवंत गुणधर्म दर्शविणारा असावा.

नर निवडताना दोन जुळ्या नरांतील एक चांगला नर निवडावा जेणेकरून पुढील पिढ्यात जुळे किंवा तिळे करडे देण्याचे प्रमाण वाढेल. दीड ते दोन वर्षे वयाचा, उत्तम प्रजोत्पादन क्षमता असणारा नर निवडावा. त्याच्यामध्ये कोणतेही शारीरिक व्यंग नसावे.

**मादीची निवड** : शेळीची निवड करताना काही मुद्दे माहिती असणे फार महत्त्वाचे आहे- जसे की, शेळी रूंद, चौकानी बांध्याची, पाय लांब, पूर्ण वाढ झालेली, त्या जातीचे गुणधर्म दर्शविणारी असावी तसेच जुळ्या किंवा तिळ्यामधील एक असावी. शेळीला दोनच सड असावे. तिसरे लहान सड जोडून नसावे. दोन्ही सड निमुळते व एकसारखे असावे. कास लोंबती नसावी. शेळी खरेदी करताना शेळीची धार काढून बघावी. जेणेकरून तिला कासदाह या स्वरुपातील आजार झालेला नसावा.



## गोठा व्यवस्थापन

गोठा व्यवस्थापन सुध्दा फार महत्वाचे आहे, कारण अचानक वातावरणात होणारा बदल हा शेळ्यांच्या आरोग्यास घातक ठरत असतो. त्याकरिता शेळ्यांचा गोठा असणे आवश्यक आहे. बहुसंख्य शेळीपालकांकडे शेळीकरिता स्वतंत्र गोठा नाही. इतर जनावरांच्या गोठ्यात तसेच झाडाखाली शेळ्या बांधल्या जातात तसेच वादळ पाऊस किंवा अतिथंडीच्या वेळी शेळ्यांना घरातच दाटीवाटीने बांधले जाते.

शेळ्यांच्या योग्य व्यवस्थापनाकरिता शेळ्यांकरिता गोठा असणे फार महत्त्वाचे आहे. तसेच गोठ्याची बाजूची उंची ४ ते ५ फूट आणि मधील बाजूची उंची १०-१२ फूट उंच असावी जेणेकरून आतमध्ये खेळती हवा राहील, त्याचबरोबर मिथेन वायूचे प्रमाण कमी होईल.

शेळ्यांना हगवणीची समस्या असेल तर शेळ्यांचा गोठा कोरडा राहील यासाठी काळजी घ्यावी. तसेच गोठ्यामुळे शेळयांना सर्दी, शारीरिक तापमान कमी होणे यापासून वाचविता येईल.

## प्रथमोपचार व लसीकरण

पाऊस व थंड हवामानात शेळ्यांना प्रामुख्याने श्वसनसंस्थेचे आजार जास्त प्रमाणात होतात. त्यात सर्दी खोकला कायम दिसून येतो. अशा वेळी शेळ्यांच्या नाकावरून टर्पेंटाईनचा बोळा फिरविल्यास सर्दी नाहीशी होते. मात्र तरीदेखील सर्दी आटोक्यात न आल्यास पशुवैद्यकांमार्फत प्रतिजैविकांचा वापर करावा.

थंड हवामाणात शेळ्यांना पिण्यासाठी स्वच्छ, कोमट पाण्याचा वापर करावा. त्यात पोटॅशिअम परमँगनेटचा योग्य

प्रमाणात वापर करावा. जेणेकरून पाण्यामार्फत होणारा संसर्ग टाळता येईल.

लसीकरणामध्ये, घटसर्प, पीपीआर तसेच ईटी या रोगाचे लसीकरण आपल्या शेळ्यांना प्रत्येक वर्षी पावसाळ्यापूर्वी करणे आवश्यक आहे. देवी या रोगाचे लसीकरण वर्षातून एकदा डिसेंबर महिन्यात करावे. तसेच लाळ्या- खुरकूत या रोगाचे लसीकरण वर्षातून दोन वेळा योग्य मात्रेत तसेच योग्य मार्गाने करणे आवश्यक आहे. गाभण शेळ्यांमध्ये शेवटच्या महिन्यामध्ये लसीकरण करणे टाळावे कारण शेवटच्या महिन्यामध्ये करडांची वाढ ही झपाट्याने होत असल्यामुळे शेळी अगोदरच तणावामध्ये असते, या कालावधीत लसीकरण केल्यास शेळी गाभडू शकते.

**शेळ्या- मेंढ्यांतील लसीकरणाचा तक्ता**

| अ. क्र. | लस | लसीकरण केव्हा व किती वेळा करावे |
|---|---|---|
| ०१ | लाळ्या- खुरकूत | वर्षातून दोन वेळा मार्च-एप्रिल महिन्यामध्ये व सप्टेंबर-आक्टोबर महिन्यामध्ये लसीकरण करावे. |
| ०२ | घटसर्प | पावसाळ्यापूर्वी एप्रिल-मे महिन्यामध्ये वर्षातून एकदा लसीकरण करावे. |
| ०३ | फऱ्या | पावसाळ्यापूर्वी एप्रिल-मे महिन्यामध्ये वर्षातून एकदा लसीकरण करावे. |
| ०४ | आंत्रविषार | एप्रिल-मे महिन्यामध्ये वर्षातून एकदा लसीकरण करावे. (दुसरी मात्रा १५ दिवसांच्या अंतराने द्यावी) |
| ०५ | देवी | वर्षातून एकदा डिसेंबर महिन्यामध्ये लसीकरण करावे. |

(गाभण शेळी-मेंढीमध्ये लसीकरण करू नये)





**विक्री व्यवस्थापन** : विक्री व्यवस्थापनाकडे बघितल्यास आज ग्रामीण भागात शेळीपालन दोन प्रकारे केले जाते एक पारंपरिक पध्दतीने व दुसरे बंदिस्त किंवा अर्धबंदिस्त पध्दतीचे, शेळीपालन. आज पारंपरिक शेळीपालकांकडे मोकाट चराईवर चरणाऱ्या शेळ्या आहेत. या पध्दतीतील शेतकऱ्यांकडे हिशोब, उत्पादन खर्च, बाजारभाव यांची माहिती जवळपास नसतेच. तसेच दुसऱ्या बाजूला बंदिस्त किंवा अर्धबंदिस्त शेळीपालकांकडे किमान उत्पादन खर्चाचा हिशोब आहे. मोकाट चराईपेक्षा बंदिस्त किंवा अर्धबंदिस्त शेळीपालनात उत्पादन खर्च वाढतो. त्यामुळे विक्री व्यवस्था काटेकोर पाळणे आवश्यक आहे. आज बाजारात प्रत्यक्ष खाटिक हे खरेदीसाठी कमी प्रमाणात असतात. बरेचसे व्यापारी (दलाल) हे ग्रामीण भागातील बाजारातून शेळ्या- बोकड खरेदी करून शहरात किरकोळ खाटिक व्यवसायिकांना अथवा मोठ्या व्यापाऱ्यांना पुरवतात. ही खरेदी शेळ्यांच्या मागील बाजूस हात लावून थोडेसे दाबून मग चर्चेद्वारे खरेदी किंमत ठरविली जाते. हा अंदाज येणे हे त्याचा अनुभवावर अवलंबून आहे. अशा प्रकारच्या खरेदी- विक्रीतून शेतकऱ्यांना योग्य दर मिळतो का ही शंका आहे. परंतु, जर शेळीपालकांनी शेळी/ पाट/ बोकडाची विक्री त्यांच्या वजनानुसार केली तर शेळीपालकास योग्य दर मिळू शकतो. यामध्ये जसजसे शेळीचे वय वाढत जाते, तसतसा जिवंत वजन दर कमी होत जातो. शेळी किंवा बोकड मटनासाठी विकताना वयानुसार मिळणाऱ्या मटनाचा अंदाज शेळीपालक काढू शकतो. परंतु गाभण शेळी, बेण्यासाठी बोकड, कुर्बानी बोकड या स्वरुपातील विक्रीसाठी हा नियम लागू पडणार नाही.

अशा प्रकारे योग्य नियोजन तसेच विक्री व्यवस्थापन केल्यास नक्कीच शेळीपालन हा व्यवसाय आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरू शकतो. ■